महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३२७ वा दिनांक : १०/११/२०२५ वार : सोमवार

## अजित पवारांकडे फडणवीसांचे मोठमोठे घपले - हर्षवर्धन सपकाळ



**बुलढाणा** : राज्यातील राजकारण, मोंढवा जमीन गैरव्यवहार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भूमिकेवरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर तीव्र निशाणा साधला आहे. अजित पवार यांच्याकडे देवेंद्र फडणवीस यांचे मोठमोठे घपले आहेत. त्यामुळेच पार्थ पवारांना वाचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. राज्यात दलाल हे सरकार चालवत आहेत. अजित पवारांनी पुणे जमीन घोटाळा प्रकरणी तत्काळ राजीनामा द्यावा. पण हे बेशरम सरकार आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. ते बुलढाणा येथे पत्रकारांशी बोलत होते.

सपकाळ म्हणाले, मुंबई, पुणेच नव्हे तर तालुका पातळीवरसुद्धा जमीन घोटाळ्याचे रॅकेट सक्रिय आहे. पुण्यातील व्यवहारांमागे मोठ्या नेत्यांचा हात आहे. अजित पवारांकडे देवेंद्र फडणवीस यांचे अनेक मोठे घपले आहेत. त्यांनी स्वतः ज्या जमिनी लाटल्या आहेत, त्याचे किस्से अजित पवारांकडे आहेत. झोटिंग कमिटीचे अहवाल दुर्लक्षित केले जातात, पण दोषींना क्लीन चिट दिली जाते. त्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी ईडीकडे जावी आण सर्वोच्च न्यायालयानेही दखल घ्यावी, अशी आमची मागणी असल्याचे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

हर्षवर्धन सपकाळ यांनी आरोप केला की, पार्थ पवारांना वाचवण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे. ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, त्यांना विजय माल्या पॅटर्नप्रमाणे देशाबाहेर पळवण्यात येत आहे. हे सरकार केवळ सत्तेच्या बचावासाठी तपास यंत्रणांचा गैरवापर करतं.

## नाव राधाकृष्ण, कृत्य मात्र कंसाचे - बच्चू कडू



**मुंबई** : शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात राज्याचे कॅबिनेट मंत्री आणि भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वादग्रस्त वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. या वक्तव्यावर प्रहार संघटनेचे अध्यक्ष आणि आमदार बच्चू कडू यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, त्यांनी थेट विखे पाटील यांच्या गाडी फोडणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील मंत्र्यांकडून कर्जमाफीवरून शेतकऱ्यांविरोधात बेताल वक्तव्यांची मालिका सुरू आहे. या यादीत आता राधाकृष्ण विखे पाटील यांचे नावही समाविष्ट झाले आहे. आधी कर्जबाजारी व्हायचे आणि नंतर पुन्हा कर्जमाफी मागायची, हे गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे, असे विधान राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले होते. त्यांच्या विधानावर शेतकऱ्यांसह विरोधकांमधूनही संताप व्यक्त होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी उपरोक्त घोषणा केली.

राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकऱ्यांबाबत केलेल्या अवमानकारक वक्तव्यावर बच्चू कडू यांनी संताप व्यक्त केलाय. नाव राधाकृष्ण आणि कृत्य मात्र कंसाचे, अशी टीका त्यांनी केली. शुकरमाना लोक तुम्हाला मारत नाही. त्यामुळे ही नालायकी थांबवा, असेही ते म्हणाले. एकीकडे फडणवीस साहेब कर्जमाफीची घोषणा करतात. तर दुसरीकडे हे वाचाळवीर मंत्री आहे जे असे वक्तव्य करतात. अशी अवलाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी हाकलून लावली पाहिजे, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

यावेळी बोलताना बच्चू कडू यांनी राधाकृष्ण विखे पाटलांची गाडी फोडणाऱ्या बक्षीस देण्याची घोषणा केली. जो राधाकृष्ण विखे पाटील यांची गाडी फोडेल, त्याला माझ्याकडून एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जाईल, असे बच्चू कडू यांनी सांगितले. तसेच मला जर त्यांची गाडी दिसली, तर मी स्वतः ती फोडणार, असा इशाराही त्यांनी दिला.

## महापालिका निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या : माजी आमदार मोहन जोशींची निवडणूक आयुक्तांकडे मागणी



**पुणे** : राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुका बॅलेट पेपरवर (मत पत्रिका) घ्याव्यात, अशी मागणी माजी आमदार, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी रविवारी निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडे केली आहे.

ईव्हीएम मशिन्स नादुरुस्त आहेत, अपुरी आहेत, अशा बातम्या वेगवेगळ्या माध्यमातून प्रसिद्ध होत आहेत. निवडणूक यंत्रांमधील ही त्रुटी नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुकांच्या वेळी तसेच महापालिका निवडणुकीच्या वेळीही रहाण्याची शक्यता आहे. व्हिव्हिपॅट मशीन बाबतही मतदारांच्या मनात शंका आहेत. मतदान पारदर्शी होण्यासाठी ईव्हीएम मशीन ऐवजी बॅलेट पेपरच वापरावा, असे मोहन जोशी यांनी निवडणूक आयुक्तांना पाठवलेल्या पत्रात सांगितले आहे.

भारतीय जनता पक्षाचे नेते निवडणूक जिंकू, अशा डरकाळ्या आत्तापासूनच फोडत आहेत. सत्तेतील मित्रपक्षांनाही बाजूला ठेवून स्वबळावर निवडणूक लढण्याची खुमखुमी भाजपला आहे. मग ते बॅलेट पेपरवर निवडणुका नकोत, असे का म्हणत आहेत? त्यांना कशाची भीती वाटते? असा सवाल मोहन जोशी यांनी भाजप नेत्यांना केला आहे.

साधारणपणे अडीच वर्षांनंतर महापालिका निवडणुका होत आहेत. त्या निःपक्ष आणि पारदर्शी वातावरणात व्हाव्यात, अशी काँग्रेसची मागणी आहे.बोगस मतदारांची नावे यादीत घुसवणे, मतदार वगळणे, असे अनेक गैरप्रकार करून भाजपने महाराष्ट्र आणि हरियाणात विधानसभा निवडणुका जिंकल्या. ही मतचोरी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी उघडकीस आणली. त्यानंतर मतदारांमध्ये जागृती झाली असून, बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी मतदारांकडूनही जोरात होत आहे, असेही मोहन जोशी यांनी सांगितले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० नोव्हेंबर २०२५


## राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी विद्यालयाचा विभागीय क्रीडात चौकर



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड)** : येथून जवळ असलेल्या रायपूर येथील शाळेच्या वसमत जि. हिंगोली येथे झालेल्या शालेय विभागीय फुटबॉल स्पर्धेत राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळेच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या चौदावर्षीय मुलीच्या संघाने सतत चौथ्या वर्षी सुद्धा घवघवीत यश प्राप्त करत राज्यासाठी आपला प्रवेश निश्चित केला. क्रीडा संघाचे मार्गदर्शक साहेबराव नेटके, खाडे अनिता व सर्व खेळाडूंचे जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. बाजीराव देसाई, क्रीडा अधिकारी रेखा परदेशी, संस्था अध्यक्ष संजय राठोड, सौ. संगीता राठोड, सचिव गजानन राठोड, शालेय प्रशासन कमांडंट संजय सोनवणे, प्राचार्य निखिल राठोड, क्रीडा प्रमुख जयभारत दूधमोगरे, दत्ता पडघान, सुनील सोळंके, श्री भुतेकर बाजीराव, मोहम्मद रियाजउद्धीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संघाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## शेख सायमा शकील यांना पीएच.डी. पदवी



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने नुकतीच शेख सायमा शकील यांना शिक्षणशास्त्र विषयात पीएच.डी. ही पदवी प्रदान केली आहे. त्यांनी “अ स्टडी ऑफ इफेक्ट ऑफ लर्निंग स्टाईल (हेमीस्फेरीसीटी) ऑन अकॅडमिक अचिव्हमेंटस ऑफ नाईन्थ क्लास स्टुडंट्स इन मराठवाडा रिजन” या विषयावर संशोधन पूर्ण केले असून हे संशोधन डॉ. सय्यद अझीझ अली अमजद अली यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले आहे. या संशोधनात मराठवाडा विभागातील नववीच्या विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या पद्धती आणि त्यांच्या शैक्षणिक यशामधील संबंधाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. शेख सायमा शकील यांच्या या यशाबद्दल शिक्षणक्षेत्रातील मान्यवरांकडून व मित्र परिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## "भारतीय विद्यार्थी दिन व वंदेमातरम दिन साजरा"



**छत्रपती संभाजीनगर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात वंदे मातरम या राष्ट्रीय गीताला 150 वर्ष झाल्याबद्दल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शालेय प्रवेश दिन सात नोव्हेंबर भारतीय विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर व्ही मस्के हे होते. प्रारंभी आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा नवनाथ गोरे यांनी वंदेमातरम या राष्ट्रीय गीतामागील पार्वभूमी बकिमचंद्र चटर्जी यांच्या आनंदमठ कादंबरी विषयी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सात नोव्हेंबर एकोणवीस या सातार्यातील शाळा प्रवेश दिनाचे औचित्य विशद केले. यावेळी कुमार प्रधान, अश्विनी खंदारे,तेजस्विनी खंदारे, आम्रपाली गाडेकर, शिवम सोनवणे आणि रोशन झाल्टे या विद्यार्थ्यांनी ' विद्यार्थी दिन व आम्ही ' या विषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा आजच्या विद्यार्थ्यांनी आदर्श घेऊन आपले जीवन व व्यक्तिमत्व फुलवावे या विषयी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर.व्ही. मस्के यांनी अध्यक्षीय समारोपात भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील वंदेमातरम चे राजकीय पर्व म्हणून असलेले महत्व व क्रांतिकारकांची चळवळ यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थी व शिक्षणाविषयीचे महत्व पटवून दिले. शेवटी डॉ. वनमाला लोखंडे यांनी आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास विद्यार्थी , प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रवीण शिंदे यांची विभागीय व्हॉलीबॉल संघात निवड




**कन्नड (कृष्णा शिंदे)** : नुकत्याच संपन्न झालेल्या शिक्षक व अधिकारी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतून व्हॉलीबॉल खेळासाठी प्रवीण शिंदे यांची विभागीय संघात निवड झाली. एकूण बारा खेळाडूंच्या संघातून शिंदे यांनी उत्कृष्ट खेळ कौशल्याचे प्रदर्शन करून आपले स्थान पक्के केले.या स्पर्धेदरम्यान शिंदे यांनी सर्व्हिस, ब्लॉकिंग व कोर्टवरील अचूक समन्वयाद्वारे संघाला महत्त्वाची साथ दिली. निवड समितीत राष्ट्रीय खेळाडू एजाज शहा व विशाल दांडेकर यांनी सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली.या निवडीच्या वेळी गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सबाहत, शिक्षण विस्तार अधिकारी मनीष दिवेकर, कार्यालयीन अधीक्षक अशोक जाधव, नागापूर केंद्रप्रमुख राहुल इंगोले, निंबा साळुंखे, विनोद राठोड आणि पवार यांच्या उपस्थितीत अभिनंदन करण्यात आले.प्रवीण शिंदे हे संभाजीनगर जिल्हा व्हॉलीबॉल संघटनेचे सदस्य असून कन्नड तालुका क्रीडा संकुल समितीवर मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते उंबरखेडा जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक असून त्यांनी क्रीडा क्षेत्रात अनेक राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडू घडविले आहेत.या निवडीबद्दल तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी, योगेश पाटील, गोस्वामी कडूबा चव्हाण, विजयसिंग बारवाल, श्याम खोसरे, रवीकुमार सोनकांबळे, राकेश निकम, उमेश हुकुमदार, अतुल द सोडे, पांडुरंग सुपेकर, मनोज रायसिंगे, प्रदीप पवार आणि फुरकान शेख यांनी शिंदे यांचे अभिनंदन केले.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० नोव्हेंबर २०२५



ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## जगदंबा विद्यालय जांभाळाच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल २५ वर्षानंतर



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** जगदंबा विद्यालय च्या १९९९ /२००० चे उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थी चे स्नेहमीलन मोठ्या उत्साहात दौलताबाद येथे पार पडलेसर्व प्रथम दिवंगत शिक्षक व विद्यार्थी मित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आलीतब्बल २५ वर्षानंतर एकत्र आलेल्या मित्र मैत्रिणी यांचा उत्साह पाहण्यासारखा होता २५ वर्षात वयक्तिक जीवनात आलेल्या चांगल्या वाईट गोष्टींचा उहापोह सर्वांनी आपल्या मनोगतातुन केला स्नेह भोजनानंतर विविध गुण दर्शनाच्या कार्यक्रमातुन अनेकांनी आपल्या कला सादर केल्या अंताक्षरी ने अजून गम्मत वाढली शेवटी निरोपाची वेळ आली एकमेकांचा निरोप घेताना लवकर भेटण्याचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता झालीयावेळी शिक्षक एस टी शिंदे, बी जि येवले, के आर नरोडे,एस यू पाटील, एस एस रिठे,ए के देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अशोक जाधव,संतोष भास्कर, शिवाजी मोहरे, विजय व्हलाटे, कांता सुंदरडे, वंदना दाणे, रमा दाणे, अंकुश खरात, गोरख खिल्लारे, साहेबसिंग व्हलाटे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## "मर्मगंध" कवितासंग्रहाचे आ. विक्रमजी काळे यांच्या हस्ते प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :-** (प्रतिनिधी) मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार मा. विक्रमजी काळेसाहेब यांच्या हस्ते नुकतेच पैठण तालुक्यातील साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर लिखित "मर्मगंध " या कवितासंग्रहाचे प्रकाशन हडको येथील गोदावरी विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच थाटात पार पडले. या प्रसंगी शिक्षक आमदार यांनी सांगितले की, "अय्युब पठाण लोहगावकर हे खडतर जीवन जगलेले असून त्यांचा बँन्डमास्टर ते शाळामास्तर असा .जीवन- प्रवास आहे. गेल्या चाळीस वर्षापासून ते मराठी साहित्य क्षेत्रात लेखन करून समाजाची व्यथा-वेदना .साहित्यात मांडून आणि बालकांसाठी मनोरंजनात्मक पुस्तकांचेही ते लेखन करीत आहे. मर्मगंध हा त्यांचा .चौदावा कवितासंग्रह आहे." या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी शिक्षक संघाचे (माधामिक) विभागाचे प्रदीप विखे आणि (प्राथमिक) विभागाचे कवी मनोज खुटे यांची प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थिती होती. तसेच याप्रसंगी वाहेद शेख, गोविंद गायकवाड, तसेच बिडकीन येथील आबरार पठाण, मुदस्सर पठाण, खालेद चाऊस हे प्रकाशन कार्यक्रमाला उपस्थित होते. शेवटी प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थितांना पेढे वाटून प्रकाशन कार्यक्रमाची सांगता झाली.

## उंदराचं पिल्लू

उंदराचं पिल्लू
ईटुकलं पिटुकलं
घाबरत नाही
अती धिटुकलं

सतत फिरते
स्वयंपाक घरात
सुगावा लागला
पळते जोरात

कपडे कुरतडण्याची
खोड वाईट
कधी कधी वाटते
करावी फाईट

चोरून नेतो
टोपल्यातली पोळी
फडशा पाडते
अखखी टोळी

टुनकुन मारतो
पलंगावर उडी
रागावून बाबा
हाती घेतात काडी

काडीला पाहून
लपतो बिळात
सामसूम होता
येतो थोड्या वेळात




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. 9011559106


## उन्हात सावली

डोईवर सूर्य
रान तापलंय
वाट चालतोय
एकटाच

सोबतीचे सारे
वाटसरू गेले
वाटेला लागले
आपुलिया

आता सोबतीला
उन्हात सावली
काया ही रापली
प्रवासात

थकलेय पाय
सरलाय त्राण
जीवाचे हे रान
करुनिया

तरी चाललोय
उन्हाशी भिडत
पाय हे मातीत
ठेवूनिया


ज्ञानेश्वर गायके,
कन्नड
94033 84889



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० नोव्हेंबर २०२५

# सार्वजनिक वाहतुकीचे सामाजिक महत्त्व : मानवकेंद्री विकासाचा अनिवार्य मार्ग

जगातील नागरीकरणाचा वेग दिवसेंदिवस वाढत आहे. शहरांचा व्यापारी, औद्योगिक, शैक्षणिक आणि रोजगाराच्या संधींमुळे विस्तार होत असताना लोकसंख्येचे स्थलांतर, वस्त्यांची वाढ, दैनंदिन व्यवहारांमध्ये गुंफणारे आयुष्य आणि ताणतणावांनी भरलेला आधुनिक काळ यामधून होणारा प्रवास हा प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर १० नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' केवळ वाहतुकीची सोय किंवा सुविधा यापुरता मर्यादित न राहता समाज, अर्थव्यवस्था, पर्यावरण, संस्कृती आणि विकास या सर्वांवर परिणाम करणाऱ्या वाहतूक प्रणालीच्या सामाजिक अर्थपूर्णतेकडे मानवी दृष्टीने पाहण्याची एक महत्त्वपूर्ण संधी निर्माण करतो. सार्वजनिक वाहतूक म्हणजे केवळ बस, रेल्वे, मेट्रो, ट्राम किंवा सार्वजनिक सायकल नेटवर्क एवढेच नव्हे, तर सामूहिक वापर, समान सहभाग आणि सबलीकरण यांची सामाजिक प्रक्रिया आहे. नागरिकांच्या सर्व घटकांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाच्या केंद्रस्थानी आणणारा हा लोकशाहीवादी वाहतुकीचा मार्ग आहे.आपल्या देशात आणि जगभरात वाढते खासगीकरण, वेगाने वाढणारी चारचाकी वा दुचाकी वाहने, रस्त्यांवरील रहदारीची कोंडी, प्रदूषणाचे प्राणघातक स्तर, संसाधनांचा अनियंत्रित वापर आणि वाढता इंधन खर्च यामुळे समाज अनेक संकटांसमोर उभा आहे. खासगी वाहनांचा वापर हा 'सोयीचा' वाटत असला, तरी तो समाजासाठी व पृथ्वीसाठी 'महागडा' ठरत आहे. खासगी वाहनाचं मालकत्व हे वैयक्तिक प्रतिष्ठा किंवा सामाजिक स्थानाचे प्रतीक मानण्याची प्रवृत्ती वाढत गेली, आणि त्यातून सामूहिकतेपेक्षा वैयक्तिकतेला' अधिक महत्त्व देण्याची वृत्ती अधिक बळकट झाली. परंतु सामाजिक आयुष्याचे खरे स्वास्थ्य हे सर्वांसाठी उपलब्ध, परवडणारी आणि समतोल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था यावर अवलंबून आहे. कारण सार्वजनिक वाहतूक ही केवळ प्रवासाची पद्धत नसून ती समाजातील असमानता कमी करण्याचे प्रभावी साधन आहे.समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता वाहतूक ही सामाजिक संरचनेचा पाया आहे. शहराचे समाजशास्त्र, ग्रामीण-शहरी अंतर, स्त्री-पुरुष समानता, शिक्षण-अभ्यास-रोजगाराच्या संधींतील समानता, आर्थिक गतिशीलता, सामाजिक परस्परसंबंध आणि पर्यावरणपूरक जीवनशैली हे सर्व वाहतूक व्यवस्थेशी खोलवर निगडित आहेत. उदा. ज्यांच्या राहण्याची व्यवस्था शहरापासून दूर किंवा उपनगरात असते, त्यांना रोजगार, शिक्षण किंवा आरोग्यसेवांपर्यंत पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतूक ही जीवनरेखा ठरते. गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सार्वजनिक वाहतूक ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे, तर महिलांसाठी ती सुरक्षिततेचे कवच आहे. ग्रामीण भागातील मजुरी करणारे लोक, शिक्षणासाठी शहरात येणारे विद्यार्थी, नोकरीसाठी प्रवास करणारे कर्मचारी, उद्योगात काम करणारे कामगार, वृद्ध, विद्यार्थी, महिला, दिव्यांग या सर्वांसाठी सार्वजनिक वाहतूक म्हणजे जीवनाला जोडणारा पूल आहे.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात सार्वजनिक वाहतुकीचा विस्तार आणि गुणवत्ता ही आर्थिक विकासाची किल्ली ठरते. बेंगळुरू, पुणे, मुंबई, दिल्ली, नागपूर यांसारख्या शहरांत मेट्रो, बीआरटीएस, ई-बस, सब-अर्बन रेल्वे आदी प्रकल्प समाजाला पुढे नेण्याचे उदाहरण आहेत. सार्वजनिक वाहतुकीचा दर्जा जिथे चांगला असतो तिथे लोकांचा प्रवास सुखकर, प्रदूषण कमी, कामाच्या संधी वाढलेल्या आणि मानसिक ताण कमी झालेला दिसतो. परंतु याच वेळी, अनेक शहरांत सार्वजनिक वाहतुकीची अवस्था अजूनही अपुरी व विस्कळीत आहे. बसेस कमी, रेल्वे गाड्यांमध्ये गर्दी, बसस्थानकांची दुरवस्था, सुरक्षा उपायांचा अभाव, अपंगांसाठी सुविधा नसणे, प्रवासाची अस्वस्थता यामुळे अनेक लोक सार्वजनिक वाहतुकीकडून दूर जातात. या परिस्थितीने खासगी वाहनांचा वापर वाढतो, आणि वाहतूक कोंडी, अपघात, प्रदूषण, वेळेचा अपव्यय, ताणतणाव या समस्या वाढत जातात. म्हणूनच, सार्वजनिक वाहतुकीत गुंतवणूक हा खर्च नसून समाजाची भविष्यातील गुंतवणूक आहे.खासगी वाहनांमुळे होणारे वायुप्रदूषण, ध्वनीप्रदूषण, जैवविविधतेचा नाश, तापमानवाढ, हवामान बदल, भूमीचे व्यापारीकरण आणि पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व हे संपूर्ण मानवजातीपुढील मोठे धोके आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालांनुसार प्रदूषित हवेचे दुष्परिणाम हे श्वसनविकार, हृदयरोग, कर्करोग, स्ट्रोक यांसारख्या आजारांना कारणीभूत ठरतात. जर सार्वजनिक वाहतूक मजबूत, सुबक आणि सुलभ असेल तर लाखो लोक खासगी वाहनांचा वापर सोडण्यास तयार होतात. यामुळे पर्यावरणाचे रक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा आणि संसाधनांचा शाश्वत वापर साध्य होऊ शकतो.आजच्या काळात ई-बस, सायकल-शेअरींग, कारपूलिंग, मेट्रो रेल्वे, हरित ऊर्जा आधारित वाहतूक व्यवस्था आणि स्मार्ट तिकिटिंग प्रणाली यांचा वापर वाढू लागला आहे. तंत्रज्ञान आणि वाहतूक व्यवस्थापनाचा संगम हा भविष्यातील वाहतुकीचा पाया आहे. पण तंत्रज्ञानाचा वापर हा माणसांना केंद्रस्थानी ठेवूनच झाला पाहिजे. वाहतूक हे फक्त वाहनांचे व्यवस्थापन नाही; ती लोकांच्या चालण्याची, जगण्याची आणि समाजाशी जोडले जाण्याची प्रक्रिया आहे.महिला आणि सार्वजनिक वाहतूक हा एक महत्त्वाचा विषय आहे. सुरक्षित, स्वच्छ, प्रकाशयुक्त, सुरक्षा यंत्रणांनी युक्त, महिलांसाठी अनुकूल सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणासाठी अत्यावश्यक आहे. अनेक वेळा असुरक्षिततेमुळे महिला शिक्षण, नोकरी किंवा सामाजिक सहभाग यांपासून दूर राहतात. म्हणूनच सुरक्षित सार्वजनिक वाहतूक ही स्त्री-पुरुष समानता घडविण्यासाठी महत्त्वाची कडी आहे.ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक अधिकच महत्त्वपूर्ण ठरते. तिथे लोक शेती, मजुरी, बाजारपेठ, शाळा, रुग्णालये, सरकारी सेवांपर्यंत पोहोचण्यासाठी बस, सामुदायिक वाहने किंवा स्थानिक सार्वजनिक वाहतुकीवर अवलंबून असतात. ग्रामीण वाहतुकीची कमतरता ही ग्रामीण भागातील लोकांना सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागे ठेवते. त्यामुळे ग्रामीण वाहतुकीचा विकास हा ग्रामीण विकासाचा मूलाधार मानला पाहिजे.सार्वजनिक वाहतुकीचा उपयोग केवळ प्रवासातच नाही तर सामाजिक संवाद वाढण्यातही होतो. बसमध्ये किंवा रेल्वेत प्रवास करताना विविध स्तरातील, मतांतील, संस्कृतीतील लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक एकजूट, संवाद आणि सांस्कृतिक समन्वय निर्माण होतो. खासगी वाहनांमुळे निर्माण होणारा 'एकाकीपणा' इथे कमी होतो. म्हणजेच सार्वजनिक वाहतूक ही लोकांना जोडणारी लोकशाहीवादी जागा आहे.आजच्या तरुण पिढीसमोर पर्यावरण, अर्थव्यवस्था आणि आरोग्य याबाबत चिंतेचे प्रश्न आहेत. अशावेळी सार्वजनिक वाहतूक स्वीकारणे हे सामाजिक जबाबदारीचे पाऊल मानले पाहिजे. जागतिक स्तरावर 'ग्रीन मोबिलिटी', 'कार्बन न्यूट्रल सिटी', 'सस्टेनेबल अर्बन डेव्हलपमेंट' यांसारख्या संकल्पना विकसित होत आहेत. त्यांचा मूळ केंद्रबिंदू सार्वजनिक वाहतुकीवर आधारित शहररचना आहे.सारांशतः, सार्वजनिक वाहतूक ही आधुनिक समाजाच्या चौफेर प्रगतीसाठी अनिवार्य आहे. ती समानता, सामाजिक न्याय, पर्यावरण संरक्षण, आर्थिक विकास, सांस्कृतिक बंध, आरोग्य व जीवनमान सुधारणा यासाठी संधी निर्माण करणारी समाजाचा कणा आहे. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला केवळ सेवा म्हणून नव्हे, तर जनहिताचा अधिकार, लोकशाहीचा आधारस्तंभ आणि शाश्वत विकासाचा मार्ग म्हणून मान्यता दिली पाहिजे.आज 'जागतिक सार्वजनिक वाहतूक दिन' हा केवळ स्मरण आणि औपचारिकता न राहता, नागरिक, सरकार, शहररचना तज्ज्ञ, वाहतूक अधिकारी, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था, आणि जनसामान्य यांनी एकत्रितपणे सार्वजनिक वाहतुकीच्या सशक्तीकरणाची प्रतिज्ञा घ्यायला हवी. सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवून, ती अधिक सुरक्षित, सुलभ, स्वच्छ, परवडणारी आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे. कारण सार्वजनिक वाहतूक मजबूत झाली, तर समाज मजबूत होईल; समाज मजबूत झाला, तर मानवजातीचा भविष्यकाळही अधिक सुरक्षित, समतोल आणि शाश्वत होईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२

bagate.rajendra5@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002